महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्या मालकीची मौजे बोरगांव मंजु येथील २७ हे. जमीन, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत अकोला येथे नविन पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापनेसाठी महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करण्याबाबत......

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : मपवि २०१६ /प्र. क्र.१४ /माफसू (भाग १),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १० जुलै, २०१९

प्रस्तावना :-

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ३ (२) मध्ये "हे विद्यापीठ, जंगम व स्थावर अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन व धारण करण्यास, विद्यापीठाच्या प्रयोजनासाठी त्यांच्याकडे निहित असेल किंवा त्यांच्याकडून संपादन करण्यात येईल अशी कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता भाडेपट्टयाने देण्यास, तिची विक्री करण्यास किंवा अन्य प्रकारे हस्तांतरीत करण्यास आणि करार करण्यास व या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ आवश्यक असतील अशा इतर सर्व गोष्टी करण्यास सक्षम असेल" अशी तरतूद आहे. तसेच कलम २७ मध्ये विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे अधिकार नमूद केलेले आहेत. यापैकी कलम २७ (सहा) मध्ये" विद्यापीठाच्या वतीने कोणत्याही स्थावर किंवा जंगम मालमत्तेचे हस्तांतरण करणे" अशी तरतूद आहे.

२. सदर तरतूदीनुसार महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या दिनांक १४/०८/२०१८ रोजी झालेल्या कार्यकारी परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र. ६१/२०१८ अन्वये महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत अकोला येथे नविन पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापनेसाठी महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्या मालकीची मौजे बोरगांव मंजु येथील सर्व्हे क्र. १२६ व १४० मधील एकूण २७ हे. जमीनीच्या मोबदल्यात डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्या मालकीची बाभूळगाव येथील एकूण २७.०० हे. आर जमीन महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना हस्तांतरीत करण्याच्या अटीस अधीन राहुन मान्यता प्रदान केलेली आहे.

३. सबब प्रस्तुत प्रस्तावाबाबत महसूल व वन विभागाने दिलेले अभिप्राय विचारात घेवून, महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत अकोला येथे नविन पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापनेसाठी महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्या मालकीची मौजे बोरगांव मंजु येथील एकूण २७ हे. जमीन डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना हस्तांतरीत करण्यासाठी महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या दिनांक १४/०८/२०१८ रोजी झालेल्या कार्यकारी परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र. ६१/२०१८ अन्वये तसेच महसूल व वन विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत अकोला येथे नविन पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापनेसाठी महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्या

मालकीची मौजे बोरगांव मंजु येथील सर्व्हे क्र. १२६ व १४० मधील (डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे ताब्यातील सर्व्हे क्र. १३५ व १३७ लगतची (सामाजिक वनीकरणाची राखीव जमीनीलगतची) दक्षिण दिशेला असलेली जमीन) एकूण २७ हे. जमीन खालील अटींच्या अधिन राहून महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करण्यात येत आहे.

अटी व शर्ती..

१) उपरोक्त प्रमाणे महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करण्यात आलेली महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्या मालकीची मौजे बोरगांव मंजु येथील एकुण २७ हे. जमीन, महसूल व वन विभागाने डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना प्रदान करावी.

२) उपरोक्त जमीनीच्या बदल्यात डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांनी बाभुळगांव येथील एकूण २७ हे. जमीन महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना हस्तांतरीत करण्यासाठी महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करावी. सदरची जमीन महसूल व वन विभागाने महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर विद्यापीठास प्रदान करावी.

३) सदर जमिन ही ज्या कारणासाठी हस्तांतरीत करण्यात आली आहे त्याच कारणासाठी तिचा वापर करावा.

४) प्रत्यार्पित करण्यात आलेली जमीन महसूल व वन विभागाने किंवा डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांनी इतरांना हस्तांतरीत करु नये. तसेच त्रयस्थ पक्षकारांचा कोणताही हितसंबंध, हक्क निर्माण करु नये .

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०७१०११२८०५८९०१ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIKAS TULSHIRAM KADAM

Digitally signed by VIKAS TULSHIRAM KADAM
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9869ec61c857e78e82b7a19b04c6d22f8ef1b8dbc9b19d45ef776d80ef148059, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=406cb152e109154a7466c0050f88e5a437e17838973824687653a5e8d144b72b, ou=AGRI AND ADF DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIKAS TULSHIRAM KADAM
Date: 2019.07.10 15:40:03 +05'30'

(विकास तु. कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल-नि-कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.राज्यमंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

७. मा. प्रधान सचिव (पदुम), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
८. मा. सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
९. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे,
१०. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक,डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
११. कुलगुरु/ कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपुर
१२. विभागीय आयुक्त, अमरावती
१३. जिल्हाधिकारी, अकोला
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, अकोला
१५. निवड नस्ती, कार्यासन माफसू, पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.